**ठळक बातम्या**

- बिहारमधे सरकारस्थापनेच्या हालचालींना वेग/निवडणूक निकालानंतर राजदमधे फूट

- छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात आज सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार

- महाराष्ट्रात आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी महायुतीच्या जागावाटपाचं चित्र येत्या दोन दिवसांत स्पष्ट होईल, असा मुख्यमंत्र्यांना विश्वास

- देशात विविध ठिकाणी झालेल्या अपघातात किमान १० जणांचा मृत्यू

**आणि**

- कोलकाता कसोटी क्रिकेट सामन्यात भारतासमोर विजयासाठी १२४ धावांचं आव्हान, मात्र दुसऱ्या डावात खराब सुरुवात

<><><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या प्रचंड विजयानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडीनं राज्यात सरकार स्थापन करण्यावर लक्ष केंद्रित केलं आहे. सरकार स्थापनेसाठी राजकीय हालचालींनी वेग घेतला आहे. या घडामोडींबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून :

- **- VC - -**

*(बिहार विधानसभा निवडणुकांमधल्या दणदणीत विजयानंतर केंद्रीय मंत्री आणि लोक जनशक्ती पार्टी (राम विलास) चे अध्यक्ष चिराग पासवान, हिंदुस्थानी अवाम मोर्चाचे अध्यक्ष संतोष सुमन यांच्यासह एनडीएच्या घटक पक्षांच्या नेत्यांनी सत्ता स्थापनेबाबत चर्चा करण्यासाठी काल पाटणा इथं जदयू चे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांची भेट घेतली. जदयू चे कार्यकारी अध्यक्ष संजय झा आणि केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह यांनीही काल संध्याकाळी नवी दिल्लीत भाजपाचे ज्येष्ठ नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या बैठकीत नवीन सरकार स्थापनेबाबत प्राथमिक चर्चा झाल्याचं वृत्त आहे.*

*तर दुसरीकडे, जदयूनं आपल्या सर्व ८५ नवनियुक्त आमदारांना पाटणा इथं बोलावून घेतलं आहे. उद्या, जदयू विधिमंडळ पक्षाची बैठक होणार असून, यावेळी पक्षाचे अध्यक्ष नितीश कुमार यांची विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड केली जाईल.*

*एनडीएचे पाचही घटक पक्ष आपापल्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्यांची निवड करण्यासाठी स्वतंत्र बैठका घेतील, त्यानंतर एक संयुक्त बैठक आयोजित केली जाईल, यावेळी एनडीएच्या नेत्याची निवड केली जाईल.)*

बिहार मध्ये उद्या राज्य मंत्रिमंडळाची शेवटची बैठक होण्याची शक्यता असून, यावेळी मंत्रिमंडळ बरखास्त करण्याची शिफारस केली जाईल.

दरम्यान, निवडणुकीतल्या दारुण पराभवानंतर राजद मधले पक्षांतर्गत मतभेद आणखी तीव्र झाले आहेत. पक्षाच्या नेत्या, माजी मुख्यमंत्री, लालू प्रसाद यादव यांच्या कन्या रोहिणी आचार्य यांनी पक्ष सोडण्याचा निर्णय घेतला आहे. कुटुंबियांबरोबरचेही संबंध तोडत असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावर जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

दिल्लीत लाल किल्ला मेट्रो स्थानकाजवळ १० नोव्हेंबर रोजी झालेल्या स्फोटाचे धागेदोरे मिळवण्याचं काम तपास यंत्रणा करत आहेत. देशभरातल्या विविध ठिकाणी अद्याप शोधमोहिमा, तपासण्या सुरू आहेत. दिल्ली गुन्हे शाखेनं आज अल फलाह विद्यापीठाविरोधात फसवणूक आणि बनावट कागदपत्रं तयार केल्याप्रकरणी दोन एफआयआर दाखल केले आहेत. दरम्यान, लाल किल्ला मेट्रो स्टेशन प्रवाशांसाठी पुन्हा खुलं झालं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय पत्रकारिता दिन आज देशभरात साजरा करण्यात येत आहे. प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचा हा स्थापना दिन पत्रकारिता दिन म्हणून साजरा केला जातो.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात आज सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. यात दोन महिला नक्षलवाद्यांचा समावेश आहे. या तिघांवर १५ लाख रुपयांचं बक्षीस होतं. आत्तापर्यंत तीन मृतदेह सापडले आहेत, तसंच एक रायफल, बीजीएल लॉन्चर्स, इतर शस्त्रास्त्रं आणि स्फोटकं जप्त केली आहेत. तुमालपाड भागातल्या जंगलात

नक्षलवाद्यांचा वावर असल्याची खबर मिळाल्यानंतर जिल्हा राखीव दलाच्या एका पथकानं या भागात शोधमोहीम सुरू केली. सुरक्षा दलं आणि नक्षलवाद्यांमध्ये आज सकाळपासून चकमक सुरु होती. सध्या या भागात शोधमोहीम सुरू आहे.

<><><><><>

जम्मू-काश्मीरच्या राजौरी या सीमावर्ती जिल्ह्यातून सुरक्षा दलांनी काल I.E.D, म्हणजेच ‘सुधारित विस्फोटक उपकरण’ जप्त केलं. या उपकरणाचा नियंत्रित स्फोट करून ते निकामी करण्यात आलं. या स्फोटामुळे थाना मंडी भागातल्या अप्पर बंगई गावातल्या एका घराचं नुकसान झाल्याचं आमच्या वार्ताहरानं सांगितलं.

<><><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अन्नपदार्थ आयातीवरचे कर कमी केले आहेत. भारतातून विशेषतः महाराष्ट्रातून होणाऱ्या आंबा आणि डाळिंबाच्या निर्यातीला याचा लाभ होणार आहे. उष्णकटिबंधीय प्रदेशातून येणारी फळं आणि फळांचे रस, चहा आणि मसाले यांच्यावर परस्पर शुल्काचा परिणाम होणार नाही. व्हाईट हाऊसनं नमूद केलेल्या इतर वस्तूंमध्ये कॉफी आणि चहा, कोको, संत्री, टोमॅटो यांचा समावेश आहे. ट्रम्प यांनी यापूर्वी भारतातून होणाऱ्या आयातीवर २५ टक्के शुल्क लादलं होतं आणि रशियाकडून इंधन तेल खरेदी केल्याबद्दल अतिरिक्त २५ टक्के दंडात्मक शुल्क लावलं होतं. अमेरिकेतील महागाई रोखण्यासाठी, ट्रम्प यांनी यापूर्वी जेनेरिक औषधांना शुल्कातून सूट दिली त्याचाही भारताला लाभ झाला. अमेरिकेला निर्यात होणाऱ्या निर्धारित जेनेरिक औषधांपैकी ४७ टक्के औषधं भारतातून पुरविली जातात.

<><><><><>

पोर्तुगालची राजधानी लिस्बन इथं सुरू असलेल्या डिप्लोमॅटिक बझार २०२५मधल्या भारताच्या प्रदर्शनाला पोर्तुगालचे अध्यक्ष मार्सेलो रेबेलो दे सूझा यांनी काल भेट दिली. भारताचे पोर्तुगालमधले राजदूत पुनीत रॉय कुंडल यांनी त्यांचं स्वागत केलं. भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि भारत-पोर्तुगाल यांच्यातल्या राजनैतिक संबंधांची ५० वर्षं यावर या प्रदर्शनात भर दिल्याची माहिती भारताच्या पोर्तुगालमधल्या दूतावासानं दिली.

<><><><><>

राज्यातल्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महायुतीच्या जागावाटपाचं चित्र येत्या दोन दिवसांत स्पष्ट होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. छत्रपती संभाजीनगर इथं ते वार्ताहरांशी बोलत होते. या निवडणुकांच्या जागावाटपाचे निर्णय जिल्हास्तरावर होतात, त्यामुळे काही ठिकाणी महायुती झाली आहे, काही ठिकाणी दोन पक्ष एकत्र आले आहेत, तर काही ठिकाणी कोणत्याही पक्षांमध्ये युती झालेली नाही. यावर चर्चा सुरू आहे, असंही ते म्हणाले. महानगरपालिकांच्या निवडणुकीत मात्र शक्य तिथं युती होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

<><><><><>

देशात विविध ठिकाणी झालेल्या अपघातांमधे किमान १० जणांचा मृत्यू झाला.

मध्यप्रदेशात ग्वाल्हेर इथं आज सकाळी झालेल्या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला. झाशीहून येणारी फॉर्च्युनर कार, वाळून भरलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीवर धडकल्यानंतर कारमधले ५ जण जागीच मरण पावले. पोलीसांनी मृतदेह ताब्यात घेतले असून पुढे तपास सुरु आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये बडगाम इथं काल झालेल्या अपघातात किमान चारजण ठार झाले, तर अनेकजण जखमी झाले. जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

उत्तरप्रदेशात सोनभद्र इथं खाणीत अडकून एकाचा मृत्यू झाला, तर १० पेक्षा जास्त कामगार अद्याप अडकले आहेत.  एनडीआरएफ आणि एसडीआरफ तसंच स्थानिक प्रशासन मदतकार्य करीत आहे.

<><><><><>

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात दोन कसोटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतल्या, कोलकाता इथं सुरु असलेल्या पहिल्या सामन्यात, दक्षिण आफ्रिकेनं भारतासमोर विजयासाठी १२४ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

आज सामन्याच्या तिसऱ्या दिवशी दक्षिण आफ्रिकेनं आपला दुसरा डाव कालच्या ७ बाद ९३ धावांवरून पुढे सुरू केला. आठव्या गड्यासाठी कर्णधार टेम्बा बवुमा आणि कॉर्बिन यांनी ४४ धावांची भागिदारी केली. मात्र बुमरानं कॉर्बिनला त्रिफळाचित करून ही जोडी फोडली.  दक्षिण आफ्रिकेचा दुसरा डाव १५३ धावांत आटोपला.

दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार बवुमा, ५५ धावांची झुंजार खेळी करुन नाबाद राहिला. भारताचा रविंद्र जडेजा यानं सर्वाधिक चार, सिराज आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी २ तर बुमरा आणि अक्सर पटेल यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

संघाच्या अवघ्या २ धावा झाल्या असतानाच यशस्वी जैयस्वाल आणि के.एल. राहुल हे दोन्ही सलामीवीर माघारी परतले.

**शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा दुसऱ्या डावात भारताच्या ४ बाद ६४ धावा झाल्या होत्या.**

दरम्यान भारताचा कर्णधार शुभमन गिल याला सामन्यात झालेल्या दुखापतीवर उपचारासाठी रुग्णालयात दाखल केलं आहे.

<><><><><>

टेनिसमध्ये एटीपी फायनल अजिंक्यपद स्पर्धेत आज अग्रमानांकित कार्लोस अल्काराज याच्यासमोर यानिक सिनर याचं आव्हान असेल. भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री साडेदहा वाजता हा सामना ट्युरिन इथं सुरू होईल. स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात कार्लोस अल्काराज यानं फीलिक्स ऑजर अलियासीम याच्यावर ६-२, ६-४ अशी मात केली होती, तर यानिक सिनर यानं ॲलेक्स डीमिनॉर याचा ७-५, ६-२ असा पराभव केला होता. अल्काराज आणि सिनर या दोघांनीही टेनिसच्या या हंगामात आपलं वर्चस्व कायम राखलं आहे.

<><><><><>

म्यानमा मधे आज पहाटे साडेतीन रिख्टर तीव्रतेचा भूकंपाचा धक्का बसला. या भूकंपाचं केंद्र भूगर्भात १० किलोमीटरवर असल्याची माहिती राष्ट्रीय भूगर्भशास्त्र केंद्रानं दिली आहे.

<><><><><>

जपानच्या प्रधानमंत्री सानी ताकाची देशाच्या दीर्घकाळापासून प्रलंबित असलेल्या तीन अण्वस्त्रविरोधी तत्त्वांचा आढावा घेण्याचा विचार करत असल्याचं जपानमधल्या एका वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेखात म्हटलं आहे. अणुबॉम्बस्फोटांची शिकार ठरलेला देश म्हणून, जपाननं तीन अण्वस्त्रविरोधी तत्त्व राष्ट्रीय धोरण म्हणून स्वीकारली आहेत. ही

सुधारणा देशाच्या सुरक्षा धोरणात महत्वाचा  बदल घडवून आणेल, आणि देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर त्याचे तीव्र पडसाद उमटतील, असं या लेखात म्हटलं आहे.

**<><><><><>**

मराठवाडा, विदर्भ, मध्यप्रदेश आणि छत्तीसगडच्या काही भागात उद्यापर्यंत थंडीची लाट राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. पूर्व राजस्थान, झारखंड आणि उत्तरप्रदेशमध्ये तुरळक ठिकाणी आज थंडीची लाट राहील, तर तामिळनाडू आणि करैकलमध्ये आज जोरदार ते अती जोरदार पावसाची शक्यता आहे.

दरम्यान, राजधानी दिल्ली परिसरात हवेची गुणवत्ता अत्यंत खालावली असून, हवा गुणवत्ता व्यवस्थापन आयोगानं दिल्ली आणि आसपासच्या भागात श्रेणीबद्ध प्रतिसाद कृती योजनेचा तिसरा टप्पा लागू केला आहे.

**//<><><><><>//**